# शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

जलंब रोड, खामगाव – ४४४३०३, जि. बुलढाणा (महाराष्ट्र)

दूरध्वनी: ०७२६३-२५६६४४ (प्राचार्य) ई-मेल: office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in

०७२६३-२५२२७८ (कार्यालय) संकेतस्थळ: www.gpk.edu.in

क्रशातंनिखा./केंद्रीय भांडार/लिलाव/२०२५/415

दि. 13 FEB 2025

## निर्लेखित साहित्यांच्या विक्रिबाबत निविदा सूचना

- शासकीय तंत्र निकेतन खामगाव, या संस्थेतील विविध विभागांमधील जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी/कालबाह्य/निर्लेखित झालेल्या यंत्र सामुग्री, उपकरणे इत्यादि साहित्यांची लिलावा द्वारे विक्री करणे आहे. सदर साहित्य हे "आहे तशा अवस्थेत, जेथे आहे तेथून" या तत्वावर "जास्तीत जास्त किमती मध्ये" विक्री करावयाचे आहे.
- साहित्यांचे दोन वेगवेगळे संच (Lot-१ आणि Lot-२) तयार केले असून इच्छूक खरेदीदार/भंगार व्यावसायिक/कंत्राटदार/ठेकेदार यांचे कडून सीलबंद लिफाफ्या मध्ये निविदा (प्रपत्र-अ) मागविण्यात येत आहेत.
- सदर साहित्यांची पाहणी करीता इच्छूक खरेदीदार/भंगार व्यावसायिक/कंत्राटदार/ठेकेदार यांनी **दि. १५/०२/२०२५ पासून दि. ०१/०३/२०२५ पर्यंत** (शासकीय सुट्टीचे दिवस वगळता) कार्यालयीन वेळेत प्रत्यक्षरीत्या उपस्थित राहून पाहणी करावी.
- सदर साहित्यच्या खरेदी करीता निविदा शुल्क रु. ५००/- (ना-परतावा) आणि अनामत रक्कम रु. ३,०००/- डिमांड ड्राफ्ट किंवा रोख रक्कम भरणे आवश्यक आहे.
- निविदा फॉर्म (प्रपत्र-अ), अनामत रक्कम आणि आवश्यक कागदपत्रे सीलबंद लिफाफ्या मध्ये या कार्यालयात **दि. ०१/०३/२०२५ रोजी संध्याकाळी ५:०० वाजे** पर्यंत जमा करावी. उशिराने आलेल्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही.
- निर्लेखित साहित्यांच्या विक्रिबाबत अटी व शर्ती आणि निविदा फॉर्म (प्रपत्र-अ) सोबत जोडले आहेत. तसेच या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.gpk.edu.in) प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.
- सहपत्र: निविदेबाबत च्या अटी व शर्ती, नमूना निविदा फॉर्म (प्रपत्र-अ)

13/02/25

(डॉ. एस. एस. प्रभुणे)

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

# निर्लेखित साहित्यांच्या विक्रिबाबत अटी व शर्ती

१. शासकीय तंत्र निकेतन खामगाव, या संस्थेतील जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी/कालबाह्य/निर्लेखित झालेल्या यंत्र सामुग्री, उपकरणे इत्यादि साहित्यांची "आहे तशा अवस्थेत, जेथे आहे तेथून, स्वखर्चाने नेणे" या तत्वावर "जास्तीत जास्त किमती मध्ये" विक्री करावयाचे आहे.

२. विक्री करावयाचे साहित्यांचे दोन वेगवेगळे संच (Lot-१ आणि Lot-२) तयार केले असून इच्छूक खरेदीदार/भंगार व्यावसायिक/कंत्राटदार/ठेकेदार यांनी Lot नुसार प्रत्येक Lot करीता वेगवेगळे दर नमूद करणे आवश्यक आहे. तसेच खरेदी किंमतीच्या अतिरिक्त १८% GST चा वेगळा भरणा संबंधित खरेदीदारास करावा लागेल.

३. इच्छूक खरेदीदार/भंगार व्यावसायिक/कंत्राटदार/ठेकेदार यांनी दि. १५/०२/२०२५ पासून दि. ०१/०३/२०२५ पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत सदर साहित्य प्रत्यक्षरीत्या पाहणी करून घ्यावयाची आहे.

४. इच्छूक खरेदीदार यांना लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी त्यांचे Aadhar Card, Pan Card, GST Registration Certificate, Shop Act License Certificate व या प्रक्रियेस आवश्यक ती ईतर कागदपत्रे यांची Xerox प्रत निविदेसोबत जमा करणे आवश्यक आहे.

५. निविदा शुल्क रु. ५००/- (ना-परतावा) जमा केल्यावरच निविदा फॉर्म (प्रपत्र-अ) संबंधित खरेदीदारास उपलब्ध करून देण्यात येईल.

६. लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी खरेदीदारास अनामत रक्कम (परतावा होणारी) रु. ३,०००/ हि डिमांड ड्राफ्ट (नावे: प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव) अथवा रोखीने रोख विभागात भरणे आवश्यक आहे.

७. संबंधित खरेदीदाराने निविदा फॉर्म (प्रपत्र-अ), अनामत रक्कम भरल्याचा पुरावा (Original डिमांड ड्राफ्ट अथवा रोख भरल्याची पावती) आणि सर्व संबंधित कागदपत्रे एकत्र करून सिलबंद लिफाफ्या मध्ये या कार्यालयात दि. ०१/०३/२०२५ रोजी संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे. उशिराने आलेल्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही.

८. इच्छूक खरेदीदार यांनी निविदा फॉर्म (प्रपत्र-अ) मध्ये Lot-१ आणि Lot-२ च्या साहित्यांच्या खरेदीची किंमत हि शासकीय किंमतीपेक्षा जास्त नमूद करावी. अधिकतम दर असणाऱ्या निविदेस प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

९. ज्या खरेदीदाराची निविदा मंजूर होईल त्या खरेदीदारास विक्री आदेश निर्गमित करण्यात येईल. विक्री आदेश निर्गमित झाल्यानंतर ५ दिवसांच्या अगोदर संबंधित खरेदीदाराने खरेदी ची रक्कम हि रोख विभागात जमा करणे बंधनकारक असेल.

१०. खरेदीची रक्कम प्राप्त झाल्या नंतरच सदर साहित्य नेण्याची परवानगी खरेदीदारास देण्यात येईल. विहित कालमर्यादेत स्वखर्चाने साहित्य घेऊन जाण्याची संपूर्ण जबाबदारी हि संबंधित खरेदी दाराची असेल.

११. ज्या खरेदी दाराची निविदा मंजूर होणार नाही अशा खरेदी दारांची अनामत रक्कम त्यांना कळविल्यानुसार विहित वेळेत परत करण्यात येईल. अनामत रक्कम परत करताना त्यांची पावती सादर करणे आवश्यक राहील.

१२. निविदेबाबत खरेदी दारांकडून कोणत्याही प्रकारची अट स्वीकारली जाणार नाही. तसेच तांत्रिक कारणास्तव साहित्य विकण्यचा अथवा न विकण्याचा अंतिम निर्णय हा या कार्यालयाचा राहील.

१३. कोणतेही कारण न देता निविदा मंजूर किंवा नामंजूर करण्याचा हक्क हा या कार्यालयाचा राहील.

१४. निविदे प्रक्रिये दरम्यान तारीख किंवा इतर अटींमध्ये बदल झाल्यास त्याबाबत सूचना या कार्यालयच्या संकेत स्थळावर आणि सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१५. साहित्य घेऊन जाताना संस्थेमधील विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी यांना त्रास होणार नाही याची खबरदारी संबंधित खरेदीदाराने घेणे आवश्यक आहे. तसेच संस्थेची मालमत्ता, इमारत यांचे नुकसान होणार नाही याकडे लक्ष देणे बंधनकारक असेल. काही नुकसान झाल्यास त्याची वसूली संबंधित खरेदीदाराकडून करण्यात येईल.

१६. संपूर्ण निविदे प्रक्रियेचे न्यायिक क्षेत्र "खामगाव" असेल.

✓ **निविदा भरण्याचा कालावधी:**

  ○ **दि. १५/०२/२०२५ पासून दि. ०१/०३/२०२५ रोजी संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत**

13/02/25

(डॉ. एस. एस. प्रभुणे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

प्रत:

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना महितीस्तव आणि संकेतस्थळावर प्रसिद्धी साठी

२. मा. सहसंचालक, विभागीय कार्यालय तंत्रशिक्षण, अमरावती यांना महितीस्तव आणि संकेतस्थळावर प्रसिद्धी साठी

३. मा. जिल्हा माहिती अधिकारी, बुलढाणा यांना माहितीस्तव

४. विभाग प्रमुख, विद्युत/संगणक/कर्मशाळा, शा. तं. नि. खामगाव यांना महितीकरिता

५. केंद्रीय भांडार, शा. तं. नि. खामगाव

६. प्रोग्रामर, शा. तं. नि. खामगाव संकेतस्थळावर प्रसिद्धी साठी

७. रोखपाल, शा. तं. नि. खामगाव आवश्यक कार्यवाहिकरीता

८. मुख्य सुचना फलक, शा. तं. नि. खामगाव

नमुना (प्रपत्र-अ)


# शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

जलंब रोड, खामगाव – ४४४३०३, जि. बुलढाणा (महाराष्ट्र)

दूरध्वनी: ०७२६३-२५६६४४ (प्राचार्य)
०७२६३-२५२२७८ (कार्यालय)

ई-मेल: office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in
संकेतस्थळ: www.gpk.edu.in


## प्रपत्र-अ

## लिलाव निविदा फॉर्म

निविदा फॉर्म क्र.: .. ..

निविदा शुल्क: रु. ५००/-

संदर्भ: शा. तं. नि. खामगाव संस्थेची निर्लेखित साहित्यांच्या विक्रिबाबत निविदा सूचना क्र.शातंनिखा/केंद्रीय भांडार/लिलाव/२०२५/ 415 दि. 13/02/2025

- ✓ मी, .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .., राहणार .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .... .. .. .., संदर्भीय सुचने द्वारे शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव या संस्थेमधील जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी/कालबाह्य/निर्लेखित झालेल्या यंत्र सामुग्री, उपकरणे इत्यादि साहित्यांची दि. .. .. .. रोजी प्रत्यक्ष पाहणी केली आहे.
- ✓ सदर साहित्यांच्या लिलाव प्रक्रियेमध्ये मी भाग घेण्यास इच्छुक असून या प्रक्रियेतील नमूद सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. करीता खालीलप्रमाणे दरपत्रक भरत आहे.
- ✓ मी हमी देतो की, माझी निविदा मंजूर झाल्यास पुढील तक्त्यातील Lot प्रमाणे नमूद सर्व रक्कम मी विक्री आदेश निर्गमित झाल्यापासून ५ दिवसांच्या अगोदर शासन जमा करेल आणि विहित कालमर्यादेत सर्व साहित्य घेऊन जाण्याची जबाबदारी माझी राहील.

| अ. क्र. | तपशिल | शासकीय किंमत | खरेदी दाराची मूळ निविदा किंमत* | अतिरिक्त १८% GST** | एकूण निविदा किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १. | Lot — १ (एकूण साहित्य संख्या: १५ | रु. ६५,६०९ /- (अक्षरी: पासष्ठ हजार सहाशे नऊ रुपये फक्त) | रु. | रु. | रु. अक्षरी: |
| २. | Lot — २ (एकूण साहित्य संख्या: ७६ | रु. १,७२,४७५ /- (अक्षरी: एक लाख बाहत्तर हजार चारशे पंच्याहत्तर रुपये फक्त) | रु. | रु. | रु. अक्षरी: |

* शासकीय किंमती पेक्षा जास्त नमूद करावी.

** १८% GST रकमेचा अतिरिक्त भरणा खरेदीदाराने करणे आवश्यक राहील.

(मागे पहा)

✓ **खरेदीदाराची माहिती:**

- पूर्ण नाव:
- पत्ता:
- मोबाईल नंबर:
- फर्म/ कंपनी/ दुकान असल्यास त्याचे पूर्ण नाव आणि पत्ता:
- GST Registration Number:
- PAN Number:
- Aadhar Number:

✓ **अनामत रक्कम भरल्याचा तपशिल:**

डिमांड ड्राफ्ट क्रमांक आणि बँकेचे नाव:

(Original DD सोबत जोडणे)

रोख भरल्यास पावती क्रमांक:

(पावती ची Xerox सोबत जोडणे)

**खरेदीदाराची सही :**

**दिनांक:**